

तेरवण मेढे परिसरात जंगलात विद्यार्थ्यांना माहिती देताना पर्यावरण तज्ज्ञ राजेंद्र केरकर.

# हळबे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची तेरवण-मेढे परिसरात भ्रमंती

**दोडामार्ग : पुढारी वृत्तसेवा**

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी तेरवण- मेढे परिसरात जंगल भ्रमंती करून वेगवेगळ्या वनस्पती, पक्षी-प्राणी यांची माहिती घेतली. गोव्यातील ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ राजेंद्र केरकर यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. बांबर्डे येथील नारायण देसाई, प्रा. डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे उपस्थित होते. महाविद्यालयाच्या भूगोल विभागाच्या वतीने या निसर्ग भ्रमंतीचे आयोजन करण्यात आले होते.

दोडामार्ग तालुका जैवविविधतेच्या दृष्टीने समृद्ध आहे. दिल्ली, मुंबई कोलकत्ता, बेंगलोर, गोवा महाराष्ट्राच्या वेगळा जिल्ह्यातील अभ्यासक येथे येतात. बहुतांश विद्यार्थी या परिसराचा अभ्यास करून आपले संशोधन अहवाल बनवतात. यापूर्वी पाणमांजर, बेडूक फुलपाखरू, पक्षी, औषधी पुष्प मसाला रान वनस्पतीचा अभ्यासासाठी देशभरातील विद्यार्थी येऊन गेले आहेत. आपल्या परिसरातील विद्यार्थ्यांनाही या जंगलाची त्यातील प्राणी-पक्ष्यांची माहिती व्हावी, त्यांच्या विषयी आवड निर्माण व्हावी, ज्ञानात भर पडावी या उद्देशाने या निसर्ग भ्रमंतीचे आयोजन करण्यात आले होते.

Scanned by CamScanner